ISSN2395-0366

**Registered with RNI** **BHAVMALA**

MAHABIL 06842/2013 Year-4, Issue-13, -April-May-Jun-2017



Printed Book/Periodicals
Book-Pocket

प्रति,
श्री./श्रीमती प्रा.डॉ. सुनंदा येवले - हिरेकर
श्री स्वामी समर्थ केंद्राजवळ,
आहेर कॉम्प्लेक्स, दुर्गानगर
नांदुरा रेल्वे जि. बुलढाणा -
443404

प्रेषक :-
प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे
संपादक, भावमाला

# भावमाला

वर्ष-४ थे, अंक-१३, एप्रिल - मे - जून २०१७

• संपादक - प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे •

पेज नं. 20 ते 25
साहित्य व इतिहास यांचा संबंध

63



# संशोधन लेख मूल्यांकन समिती

## (रिसर्च पेपर रिव्हिव्ह कमिटी)

(खालील प्रमाणे सत्र २०१७-२०१८ साठी नियुक्त केली आहे.)

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. प्रमोद गारोडे, परतवाडा | मो. नं. ९४२३६२३३६० |
| २. | प्रा. डॉ. प्रवीण बनसोड, नेर | मो. नं. ९४२३४२५१२९ |
| ३. | प्रा. डॉ. रमेश जाधव, नांदगाव (खंडे.) | मो. नं. ८४२१६२६३०० |
| ४. | प्रा. डॉ. सुनंदा रेवसे, नादूरा (रेल्वे) | मो. नं. ९४२२१२६८८१ |
| ५. | प्रा. डॉ. अविनाश घोबे, शेंदूरजना घाट | मो. नं. ९४२०१९००४० |
| ६. | प्रा. डॉ. शिवप्रसाद वायाळ, वाशीम | मो. नं. ९४०५१८५८१० |
| ७. | प्रा. डॉ. उदय जाधव, खटाव सातारा | मो. नं. ९४२३८०७५०५ |
| ८. | प्रा. डॉ. वाल्हेकर, पुणे | मो. नं. ९४२१००११७४ |
| ९. | प्रा. डॉ. गजानन बनसोड, अमरावती | मो. नं. ९७३०४१९१५९ |
| १०. | प्रा. डॉ. मिलींद भिलपवार, दर्यापूर | मो. नं. ९७६६३२३३५४ |
| ११. | प्रा. डॉ. दिनेशचंद्र राऊत, अमरावती | मो. नं. ९७६४६८८१५८ |
| १२. | प्रा. अनुप नांदगावकर, कारंजा | मो. नं. ९९२२३२०८१५ |
| १३. | प्रा. अभय जोशी, उमरखेड | मो. नं. ९९२०५५०६७९ |

ISSN2395-0366




[illegible] – डॉ. [illegible]
डॉ. बाबासाहेबांचे योगदान
२. बिराडकार-भटक्या विमुक्तांचा तेजस्वी तारा – प्रा. विजय वाघमारे
३. 'संगोळी' या लोककलेचे जतन संवर्धन आणि तत्वचिंतन – प्रा. मंदाकिनी मेश्राम
४. साहित्य इतिहास यावा परस्पर संबंध – प्रा. डॉ. सुनंदा रेवसे
५. म. गांधींचे दक्षिण आफ्रिकेतील कार्य – प्रा. के. एस. हिरेकर
६. हास्यरसाची अभिनव मेजवाणी : 'हास्यगाथा' – प्रा. डॉ. प्रल्हाद वावरे
७. दलित कथेची पृथगात्मता: – प्रा. डॉ. माणिक मानक.

• परीक्षणे–
१. 'भरकाडी':भटक्या विमुक्त साहित्याचा मानबिंदू – प्रा. डॉ. मनोहर रोकडे
२. स्त्रीजीवनाचा समग्र आढावा घेणारा काव्यसंग्रह : 'अंधारडोह' – प्रा. डॉ. शिवप्रसाद वायाळ

• दोन प्रेरक लघुकथा–
१. जीवंत आईचे श्राद्ध –संकलन : जलवर्षा
२. एका आदर्श मुलीचे आदर्श विचार –संकलन : जलवर्षा

• कविता–
१. नदी जोडणी प्रकल्प – पुडलिक भेंडे
२. बाबासाहेब इज इनफिनेटींग – प्रा. डॉ. रुपेश कऱ्हाडे
३. सावली (गझल) – मसूद पटेल
४. पुनव – अशोक लोटनकर
५. माझी मराठी – सौ. साधना बाळासाहेब पौळ
६. चतकोर भाकर – भालचंद्र दरणे
७. वस्तीच्या कविता – शांताराम हिवराळे
८. गांधी आणि मोदी – प्रा. शरद जवंजाळ
९. जाणीव प्रज्ञासूर्याची – अमोल पाईकराव
१०.मी एक शेतकरी – पवन प्रकाश जाधव


हा अंक प्रकाशक, मालक प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे यांनी निलेश प्रिन्टर्स, आठवडी बाजार, पुसद येथे छापून ग्रीन पार्क क्र. १ येथे खाजगी वितरणासाठी प्रकाशीत केला. या त्रैमासिकातील लेखकांनी लिहिलेल्या मताशी संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुसद न्यायालयाअंतर्गत राहील.

ISSN2395-0366

# साहित्य व इतिहास यांचा परस्पर संबंध

इतिहासाप्रमाणेच तत्वज्ञान, धर्म, नीतीशास्त्र, अध्यात्म इ. नीतिप्रधान शास्त्रांना साहित्याच्या सीमारेषा सरळ भेदून जातात. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, रामदास इ. तसेच प्राचीन वाङ्मय समृद्ध करणारे विविध संप्रदाय ह्यांचा अभ्यास हा साहित्याच्या कक्षेत जमा होईल ही सारी शास्त्रे मानवशास्त्रे आहेत. ती अद्याप काटेकोरपणे शास्त्र या दृष्टीने प्रगत व्हावयाची आहेत. साहजिकपणे ह्या क्षेत्रात अनेक प्रकारची ग्रंथनिर्मिती व संशोधन झाल्यावर मगच त्यांचे निश्चित स्थान व स्वरूप स्पष्ट होणार तोपर्यंत सीमा प्रांतातच ह्यांचा समावेश होणार.

प्राचीन वाङ्मयाचा तत्वज्ञान, धर्म, नीती, अध्यात्म यांच्याशी जसा अतूट संबंध आहे तशा प्रकारची परिस्थिती आधुनिक वाङ्मय व राज्यशास्त्र, अर्थसंघटना, मानसशास्त्र या शास्त्राबाबत आहे. आधुनिक वाङ्मयातील आविष्करण ह्या सर्व शास्त्रांना भेदून जाते. वर उल्लेखिलेल्या प्रत्येक ज्ञानशाखेने आधुनिक वाङ्मयावर खोल असा ठसा उमटविलेला आहे इतका ही शास्त्राची जाणीवपूर्वक माहितीकरून घेतल्या विना आधुनिक वाङ्मयातील जीवन-चित्रण विषयक साक्षेप पूर्णपणे ध्यानात येणार नाही. याही बाबतीत हेच लक्षात धरावयास हवे की ती शास्त्रे विकासावस्थेत आहेत व वाङ्मय हेही पण प्रयोगावस्थेत आहे त्यामुळे ह्या दोहोंचे संबंध कशा प्रकारचे असावे, असतात? हा वाङ्मयीन क्षेत्रातील एक चिरंतन चर्चेचा विषय आहे. कधी लंबक एका बाजूस झुकतो, कधी दुसऱ्या बाजूस. अशा पुष्कळ चर्चेनंतर व संशोधनानंतर काही कालानंतर वाङ्मय व ही सारी शास्त्रे यांच्या मर्यादा स्पष्ट होण्यास कदाचित मदत होईल.

पण एका दृष्टीने हे असंभाव्य दिसते. कारण साहित्याचा संबंध प्राय:मानवी व जाणिवा यांच्याशी असतो आणि तो तसाच राहणार. मानवी जाणिवा पूर्वी बऱ्याच स्थूल स्वरूपाच्या असत. जीवनाच्या गुंतागुंती बरोबर त्यांचे स्वरूप बरेच गुंतागुंतीचे होणे बरेच अपरिहार्य दिसते. मानवी जीवनाची धारणा ही अशीच गुंतागुंतीची होत आहे आणि ही क्रिया अशीच पुढे चालू राहणार आहे असे दिसते. विज्ञानाच्या क्षेत्रातील विविध शोधांमुळे, अर्थशास्त्र, समाजशास्त्रातील विविध लोककल्याण प्रवण प्रवृत्तींच्या प्रभावामुळे व ऐहिकप्रधान मनोधारणेमुळे यापुढे मानवी जीवन अधिकाधिक सुखसमृद्धीने संपन्न होणार हे उघड झालेलडे आहे. पण बाह्यता म्हणजे भौतिक जीवनात सुखसमृद्धीची लयलूट झालेल्या माणसाच्या मनाची संवेदनशीलता अधिकाधिक वाढत जाणार आहे.



हेही लक्षात घेणे जरूर आहे. आजही प्रगत राष्ट्रात वाङ्मयीन क्षेत्रास संवेदनविश्व असे म्हटले जाते. या संवेदनाची एक परिभाषा निर्माण झालेली दिसते. व तिच्याद्वारे साहित्याचे परिशिलन होवू लागले आहे. कित्येकदा ते इतके सूक्ष्म व सूचक असते की उपरिनिर्दिष्ट विविध शास्त्रातील प्रमुख तत्वांचा, प्रक्रियांचा वा प्रतिक्रियांचा त्यांच्या परिणामांचा अभ्यास हा वाङ्मयीन संशोधनास केवळ अत्यावश्यक आहे. ह्यावरून असे स्पष्ट होईल की, साहित्य हे इतर ज्ञानाची उतारपेठ आहे.

**साहित्याचे अनन्यसाधारणत्व :** (मोठेपण कशात आहे) साहित्य संशोधनात किती निरनिराळया प्रकारच्या शास्त्रांच्या सरहद्दीपर्यंत आपणास जावे लागते इ. गोष्टींचे ही विवरण तटस्थ भूमिकेने केले. त्यावरून साहित्याच्या मर्यादाची जाणीव झाली. तथापी साहित्याचे मोठेपण कशात आहे हे पाहणे आवश्यक आहे. साहित्याचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य म्हणजे माणसाचे संपूर्ण जीवनदर्शन मानवी जीवनाच्याच पार्श्वभूमीवर घडविणे. साहित्य, मानवी जीवन व माणूस ह्यांची फारकत न करता एकमेकांच्या सानिध्यातच त्यांचे चित्रण करते याच कारणाने ते अतिशय मनोज्ञ कलापूर्ण व समीक्षासम होते.

१. विज्ञानशास्त्रे माणसाला व समाजाला जगातून काढून टाकून मानव निरपेक्ष मानव रहित अशा जगाचा परिशोध करतात.

२. सामाजिकशास्त्रे विज्ञानाला व माणसाला बाहेर ठेवून मानवनिर्मित समाजाची रचना ठेवणे इ. चा अभ्यास करतात.

३. तत्वज्ञान हे माणसाच्या प्रज्ञेला विज्ञान, सामाजिक शास्त्रांपासून व माणसांपासून अलग करते. व त्याच्या बुद्धीचा किंवा इतर मानसिक शक्तींचा आवाका शोधते.

४. मानसशास्त्र हे माणसाचे मन जगापासून, समाजापासून काढून त्यांचे खरेखुरे व क्वचित प्रसंगी उघडेनाघडे न्याहाळण्याचा प्रयत्न करते.

याचाच अर्थ ही सारी शास्त्रे माणसाचे, तो राहत असलेल्या विश्वाचे त्याने निर्माण केलेल्या समाजाचे, त्याच्या मन:सामथर्याचे प्रत्येक क्षेत्र इतर संबंधी घटकापासून वेगळे काढून त्याचा सत्वशोध घेते. ह्या सर्वाच्या सानिध्यात ठेवून माणसाच्या मनाचा, जीवनाचा व तो राहत असलेल्या आणि त्याने तयार केलेल्या विश्वाचा शोध घेणे हे साहित्याचे वैशिष्ट्य शोधने हे साहित्यच करू शकते. हे वैशिष्ट्य लक्षात घेतले तर इतर अनेक प्रकारची व कितीही शास्त्रे पुढे आली तरी घाबरून जाण्याचे कारण नाही,

तसेच त्यांना टाळण्याचे पण कारण नाही. विज्ञानाच्या परिसरात, समजांच्या परिवेशात, स्वतःच्या जीवनाच्या वा कसल्यातरी अनामिक जाणीवांनी व्याकूळ होवून विश्वाचा त्या मागील तत्वांच्या माणसाचा शोध चालू आहे. ह्या सर्वातले त्याचे माणूसपण शोधणे हे साहित्याच्या संशोधनामधले अंतिम उद्दिष्ट आहे. साहित्याच्या माध्यमाने माणूस हा माणसाच्या शोधात आहे अशी आजच्या साहित्याची व्यवच्छेदक खूण सांगीतली जाते. तिच्यातले मर्म लक्षात घेतले तर साहित्य क्षेत्राच्या मर्यादा बरोबरच साहित्य क्षेत्राचे सामर्थ्य पण जाणवते गवसते म्हणजे समाजशास्त्रे व काही प्रमाणात विज्ञान शास्त्रे व तसेच मानवशास्त्रे ही साहित्याच्या अभ्यासाला पोषक असली तरी त्याच्या पाण्यात किती खोल जायचे? तर जोपर्यंत माणूस स्वतःच्या पायावर उभा असल्याचे ती दाखवतात तोपर्यंत इतिहासात, समाजशास्त्रादी सामाजिक शास्त्रात, मानसशास्त्रादी कोठपर्यंत जायचे माणसाचा संबंध संपून त्यांच्या मानवनिरपेक्ष संचार सुरू झाला की परतायचे? हे लक्षात ठेवले तर साहित्यातून माणसाचा शोध कुठपर्यंत करायचा याचा आडाखा येवू शकेल.

माणसाचा विविध क्षेत्रीय संचार : माणसाच्या शोधार्थ जर साहित्याचे आलोचन करायला लागलो तर मनुष्याच्या विविध क्षेत्रीय संचाराची कल्पना येईल. ज्यावेळी भौतिक जीवन पराकाष्ठेचे परावलंबी होते त्यावेळी माणसाने देवाचा शोध लावला आपल्या जीवनात राम आणला व आपल्या जीवनातील अगतिकता कमी केली. थोडक्यात साहित्याचे सामर्थ्य संपूर्ण माणसाचे दर्शन त्याच्या जीवनाच्या सानिध्यातच घडविण्यात कसे आहे हे स्पष्ट होईल. ह्या माणूसपणाचा विशिष्ट पार्श्वभूमिवरून शोध करणे वाङ्मयीन संशोधकाचे उद्दिष्ट म्हणजे माणसाचा स्वतः संबंधिचा जो व्यापक शोध चालला आहे. त्याला आपल्या परीने सहाय्य करणे हेच संशोधकाचे इच्छित कार्य होय. साहित्याला प्राप्त झालेले मोठेपण कोणत्याही 'दैवी' गुणांमुळे नसून त्याच्या ठायीच्या 'मानवी' गुणांमुळे आहे हे जरी लक्षात आले तरी साहित्याच्या परिशोधा च्या निरनिराळ्या वाटा दिसावयास लागतील व अंधारातही काही प्रकाशकिरण लाभल्या सारखे होईल. ढगांच्या रूपेरी कडा त्या ह्याच नाही का?

साहित्य व इतिहास परस्पर संबंध–साहित्य हे एक प्रकारचे दस्ताऐवजी साधन असल्यामुळे त्याचा अभ्यास प्रायः ऐतिहासिक भूमिकेवरून करावा लागतो. या कारणाने साहित्य संकल्पना व ऐतिहासिक संकल्पना यातील सीमारेषा अगदी पुसट होतात. मुद्रणाच्या शोधापुर्वी ग्रंथ हे हस्तलिखित स्वरूपातच असत. त्याची नक्कल अभ्यासक आपल्या उपयोगा करीता तयार करीत असत. त्यासाठी मोठमोठे ग्रंथकार



काही लेखकही बाळगीत. (त्यांच्याकडून ग्रंथांची नक्कल बिनचूक होत असे अशातला भाग नाही.) या कारणांमुळे एखाद्या जुन्या व विशेषतः सर्वसामान्य ग्रंथाची अधिकृत सहिंता प्रत तयार करणे हे एक महत्वाचे वाङ्मयीन सं. कार्य गणले जाते. भांडारकर प्राच्य–विद्यासंशोधन संस्थेतर्फे महाभारताची अशी अधिकृत संहिता–प्रत तयार करण्याचे कार्य आज कित्येक वर्ष चालू आहे. ज्ञानेश्वरीच्या उपलब्ध प्रती विचारात घेवून अधिकृत संहिंता ठरविण्याचा प्रयत्नही इतिहासाचार्य राजवाडे आदि संशोधकांनी केलेला आहे. (य. खु. देशपांडे, कोलते ह्यांनी अनेक मूळप्रती मिळविल्या आहेत) हे पाठचिकित्साशास्त्र सिद्ध करतांना ऐतिहासिक साधन चिकित्साशास्त्राचीच तत्वे अवलंबिली आहेत. खरे पाहता हा एक इतिहास संशोधनाचाच भाग आहे. किंवा अधिक स्पष्टपणे म्हणायचे झाले तर याठिकाणी वाङ्मय व इतिहास यांची क्षेत्रे एकमेकांत मिसळून गेलेली असतात. चिकित्सेची तत्वे इतिहास संशोधनापासून घेतलेली असतात.

प्राचीन ग्रंथाप्रमाणेच प्राचीन शिलालेख, करारनामे, पत्रव्यवहार इ. चे सिद्धीकरण हे संशोधनात्मक कार्य याच क्षेत्रात जमा होते. येथे संशोधकाची कठोर चिकित्सकता किती महत्वाची आहे हे लक्षात येईल. वाङ्मयीन संशोधन कार्यात अनेक शास्त्रांच्या संशोधन पद्धतीचा अवलंब करणे अपरिहार्य ठरते. त्यादृष्टीने इतिहासाचा एक संस्कार याठिकाणी पाहिला. इतिहासाचा वाङ्मयीन संशोधनावर हा एवढाच परिणाम आहे असे नव्हे किंबहुना अशाप्रकारच्या संशोधनाचा गाभा उर्फ कणा हा इतिहास संशोधन हाच आहे. त्यामुळे आतापर्यंतचे बरेचशे वाङ्मयीन संशोधन महाराष्टातील प्रसिद्ध इतिहास संशोधन संस्थांनी केलेले आहे. विशुद्ध वाङ्मय संशोधनास वाहिलेल्या संस्था अलिकडेच पुढे येत आहेत. त्याचे कार्य हे बरेचशे इतिहास–संशोधन–संस्था सारखे आहे. एकापरीने ते अपरिहार्य आहे. साहित्याचा इतिहासाशी आणखी दोन–तीन प्रकारचा संबंध येतो– पहिला प्रकार म्हणजे इतिहासातील किवा पौराणिक व्यक्तीच्या जीवनातील घटना प्रसंगावर काव्य, कथा, कादंबरी, नाटक इ. ची उभारणी झालेली असते. साहजिकपणे त्या व्यक्तीप्रसंगाची इतिहासातील अगर पुराणातील मुर्ती व कथाकारांनी, कलावंतांनी स्वतःच्या प्रतिभेतून निर्माण केलेली मुर्ती या दोहोची तुलनात्मक पाहनी करावी लागते. येथे इतिहास पुराणाचा तुलनेसाठी अभ्यास करावा लागतो. कित्येक वेळा लेखकही भूतकाळात जमा झालेला असतो. म्हणजे लेखकाच्या वेळच्या ऐतिहासिक, सामाजिक जीवनविचार इ. वैशिष्ट्यांचाही मागोवा घ्यावा लागतो. हे सारे करीत असताना आपण वाङ्मय संशोधन करतो ही जाणीव ठेवावी लागते. अशा प्रकारच्या संशोधनासाठी विश्वसनीय अशा सामाजिक, सांस्कृतीक इतिहासाची आवश्यकता असते. त्याविना

लेखकाच्या प्रेरणा, मनोवृत्ती, ध्येय इ. वर प्रकाश पडत नाही. साहित्याचे क्षेत्र समावेशक आहे. कित्येक वेळा विशिष्ट राजकीय, सामाजिक हेतुने समकालीन गरज भागविण्याच्या प्रयत्नातून साहित्यनिर्मिती होत असते. लो. टिळक,आगरकर, शि. म. परांजपे, न. चि. केळकर आदी मान्यवर संपादकांनी आपपाल्या वृत्तपत्रातून लेखन केले. त्याला पुढे वाङ्मयीन महत्व प्राप्त झाले. एडमंड बर्क या फ्रेंच राज्यक्रांतीवरच्या चिंतनाचेही असेच आहे. तिच गोष्ट रस्किन, कार्लाइल, मेकॉले, मोर्ले इ. विचारवंतांनी त्यांचे त्यावेळचे राजकीय, सामाजिक स्वरूपाचे लेखन वाङ्मय स्वरूपात आज आपणासमोर वाङ्मय अभ्यासासाठी पुढे असू शकते. त्या लेखकाचे मर्म समजून घेण्यासाठी लेखकाच्या कालाचा अभ्यास बारकाईने करावा लागतो. साहित्याचा इतिहासाशी संबंध येण्याचा हा दुसरा प्रकार होय.

एकंदरीत पाहता वाङ्मयीन अभ्यासकाला चोखंदळ ऐतिहासिक दृष्टी असावी लागते. महाराष्ट्रातील पुष्कळसे संशोधन न. र. फाटकादी प्रज्ञावंत इतिहास संशोधकांनी केलेले आहे. व त्यात इतिहास संशोधन संस्थांचा फार मोठा कार्यभाग आहे. ह्याचे कारण वाङ्मयाच्या इतिहासाशी असणाऱ्या ह्या इतिहासाचा संबंध वाङ्मयाच्या अभ्यासात आणखी एका प्रकाराने येतो व तो वाङ्मयीन इतिहासाचे लेखन करण्याच्या निमित्ताने वाङ्मयीन इतिहासात इतिहासाला महत्व किती व वाङ्मयाला महत्व किती, त्याचे संबंध कशाप्रकारचे असावे. वाङ्मयीन इतिहासात लेखकाच्या वाङ्मयीन गुणांची, तसेच त्याच्या मान्यवर कृतीचे समीक्षण हे इतिहासकाराच्या दृष्टीतून यावे का वाङ्मयीन समीक्षकाच्या दृष्टीतून यावे इ. विषय हे चर्चेला चिरंतन खाद्य पुरविणारे विषय आहेत. त्याबाबतचे निश्चित नियम सांगता येणार नाहीत. विज्ञानशास्त्राच्या मानाने सामाजिक शास्त्रे अलिकडची म्हणून त्याचे संशोधनही अद्याप प्रयोगावस्थेत आहे. असे पाश्चात्त विचारवंत मान्य करतात. यातून पुढे मागे त्या क्षेत्रातील संशोधनास शास्त्रीयता प्राप्त होणार आहे. असे तिकडे मानले जाते. वाङ्मयीन संशोधनाबाबतही असेच म्हणता येईल. वाङ्मयाच्या इतिहासाचे अनेक उपक्रम झाल्यावर मग त्यातून पुढे मागे वाङ्मय इतिहासाचे प्रमुख तत्वे व पद्धती निर्माण होतील. ती निर्माण होण्यासाठी आपला प्रयत्न कारणीभूत होणार आहे. ही जाणीव ठेवून संशोधन झाले तरी पुरे आहे.

– प्रा. डॉ. सुनंदा रेवसे
नांदूरा (रेल्वे) जि. बुलढाणा
संवाद-९४२१७४६९७५

***



# म. गांधीजींचे दक्षिण आफ्रिकेतील कार्य

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतीच्या इतिहासात म. गांधीजींचे नाव सुवर्ण अक्षरांनी कायम कोरल्या गेले. भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे ते पंचप्राण ठरले. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर म. गांधीजींचा प्रभाव अखेरपर्यंत टिकून राहिला. म्हणून १९२० नंतरच्या स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडास 'गांधीयुग' असे म्हटले जाते. अलीकडे जगातील अनेक विचारवंत जिज्ञासू, अभ्यासू, तत्वज्ञ, राजकीय नेते आणि वेगवेगळया क्षेत्रातील कुशल व्यक्तीमत्वांनी म. गांधीजींना आपला आदर्श मानलेले निदर्शनास येते.

**म. गांधीजींचा उदय-**

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ आक्टोबर, १८६९ गुजरात मधील पोरबंदर जि. काठेवाड येथे एका मध्यमवर्गीय कुटूंबात झाला बॅरिस्टर झाल्यानंतर गांधीजी भारतात परतले व राजकोट येथे वकिली करू लागले. पुढे त्यांनी मुंबईला आपला व्यवसाय सुरू केला. एका मुस्लीम फर्मच्या कामानिमित्त गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत जावे लागले ही घटना गांधींचे जीवनचक्र बदलण्यास कारणीभूत ठरली. तेथेच गांधीजींच्या राजकीय जीवनाचा शुभारंभ झाला. दक्षिण आफ्रिकेत त्यावेळी तिव्र स्वरूपाचा वर्णद्वेष होता. तेथील ब्रिटीश सत्ता काळयाच्या पर्यायाने भारतीयांचा द्वेष करून त्यांच्यावर सतत अन्याय अत्याचार करित असे. 'न्याय' ही संकल्पना गांधीजींच्या अंगाप्रत्यंगात मुरलेली असल्याने दक्षिण आफ्रिकेच्या वसाहतीत राहणाऱ्या हिंदी लोकांवर होणारा अन्याय, वंशभेद अवमान पाहून त्यांचे सात्वीक मन बंड करून उठले आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्याचे मनी धरले. दक्षिण आफ्रिकेत राहणारे हिंदी लोक तीन प्रकारचे होते-

१. १८९० नंतर दक्षिण आफ्रिकेतील उस मळयात काम करण्यासाठी गेलेले मुख्यत: दक्षिण हिंदुस्थानातील शेतमजूर.
२. व्यापारासाठी गेलेले मुस्लीम मेमन समाजातील व्यापारी.
३. ठराविक मुदतीसाठी कॉन्ट्रक्टवर गेलेले परंतु कॉन्ट्रक्ट संपल्यावर तेथेच मुलाबाळासहित कायम वस्ती करून राहिलेली कामगारांची कुटूंबे. या कामगारापैकी बहुतेक निरक्षर व अज्ञानी होते.

वरील सर्व हिंदी लोकांवर वंशभेदापायी होणारा अन्याय नित्याचाच होता गोऱ्या